अवांतर खाजगी स्पर्धा परीक्षा,टॅलेंट सर्च परीक्षांच्या आयोजनाबाबतचे धोरण.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: परीक्षा-२०१७/प्र.क्र.१०४/एस.डी.-२
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०४ ऑक्टोंबर, २०१७

<u>वाचा</u> :- प्राथमिक शिक्षण संचालनालय पत्र क्र.प्राशिसं/संकीर्ण पत्रे/२०१६-१७/५१६, दि.७ जानेवारी,२०१७

<u>प्रस्तावना-</u>

राज्यातील काही शाळांमध्ये खाजगी संस्थामार्फत काही अवांतर परीक्षांचे आयोजन केले जाते.या अवांतर खाजगी परिक्षा प्रामुख्याने संस्थांतर्गत परिक्षा, मुख्याध्यापक संघातर्फे परिक्षा, अशासकीय संस्था/खाजगी संस्था/खाजगी व्यक्ती यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षा, या घटकांकडून घेण्यात येतात. विद्याप्राधिकरण / राज्यमंडळ यांच्यामार्फत घेण्यात येणा-या परीक्षा अभ्यासक्रमावर आधारित असतात. तसेच बालकांचे मानसिक वय,क्षमता विचारात घेऊन निश्चित केलेल्या असतात.तथापि, संस्थातर्फे घेण्यात येणा-या खाजगी स्पर्धा परिक्षा,परिक्षेचे स्वरुप,अभ्यासक्रम,गुणांकन यांचे अशा प्रकारे परिक्षण झालेले नसते.विविध व्यक्ती/संस्था वेगवेगळे शुल्क आकारुन अशा परिक्षा घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुलांच्या मनावर या अतिरिक्त परिक्षांमुळे येणारा ताण कमी करण्याच्या दृष्टीने परवानगीशिवाय परिक्षेचे आयोजन करण्यास निर्बंध असावेत यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिनांक ०७.०१.२०१७ च्या पत्रानुसार अवांतर खाजगी नियमबाह्य स्पर्धा परिक्षा, टॅलेंट सर्च परिक्षा घेण्यात येऊ नये, असे निर्देश दिलेले आहेत. तथापि यानंतर महाराष्ट्र राज्यातील अनेक संस्थांनी त्यांच्या परिक्षांना विशेष बाब म्हणून परवानगी देण्याची मागणी केलेली आहे.ही बाब विचारात घेता अवांतर खाजगी स्पर्धा परीक्षा,टॅलेंट सर्च परीक्षा आयोजित करण्यासाठी धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

१) महाराष्ट्र राज्यातील शाळांमध्ये अवांतर खाजगी स्पर्धा परीक्षा,टॅलेंट सर्च परीक्षा आयोजित करावयाच्या असल्यास खालील अटींची पूर्तता संबंधित संस्थेने करणे आवश्यक आहे.

i) एका शिक्षण संस्थेच्या २५ पेक्षा जास्त शाळा असतील तर अशा संस्था त्यांच्या संस्थांतर्गत विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षा आयोजित करु शकतील.

ii) विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत पूरक वाचनास प्रोत्साहन देणारी, राष्ट्रपुरुषांची माहिती देणारी, व्यक्तिमत्व विकास घडविणारी परीक्षा एखाद्या खाजगी संस्थेने/मंडळाने/ विद्यापीठाने तयार केली असेल व सदर संस्था ना नफा ना तोटा तत्वावर काम करत असेल तर, सदर संस्था स्पर्धा परिक्षा आयोजित करु शकेल. अशा खाजगी संस्थांचे मागील ३ वर्षांचे वार्षिक ताळेबंद संस्था निबंधक कार्यालयाकडे सादर केले असणे आवश्यक आहे.

iii) राज्यस्तरीय अध्यापक मंडळ / शिक्षक संघामार्फत घेण्यात येत असलेल्या राज्यस्तरीय परिक्षांबाबत संबंधित विषयांतील तज्ञ शिक्षकांनी स्वत: प्रश्नपत्रिका तयार केल्या असल्यास सदर मंडळ/संघ स्पर्धा परिक्षा आयोजित करु शकतात.

२. अवांतर स्पर्धा परीक्षांचे आयोजन करु इच्छिणा-या संस्थांनी याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडे सादर करावा.शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी वरील निकषांची पूर्तता करत असल्याची तपासणी करुन संस्थेस अवांतर परीक्षांचे आयोजन करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.सदर प्रस्ताव तपासून शासन अवांतर स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यास मान्यता देण्याचे आदेश निर्गमीत करील.शासनाने मान्यता दिलेल्या संस्थांची यादी विभागाच्या तसेच शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

३. स्पर्धा परिक्षांचे आयोजन हे विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेस चालना देण्यासाठी, पूरक वाचनास प्रोत्साहन देण्यासाठी, व्यक्तिमत्व विकास घडवण्यासाठी, सामान्य ज्ञान वृद्धीसाठी,नागरी सेवा स्पर्धा परीक्षांसाठी अथवा राष्ट्रपुरुषांची माहिती देण्यासाठी असावे. सदर अवांतर स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून नफा कमविणे हा उद्देश कोणत्याही स्पर्धा आयोजकाचा नसावा.त्यामुळे स्पर्धा आयोजनासाठी येणारा खर्च विचारात घेवून मोफत अथवा विद्यार्थ्यांकडून नाममात्र फी घेवून अवांतर स्पर्धा परिक्षांचे आयोजन करावे.शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचेकडे प्रस्ताव सादर करताना संबंधित संस्थेने स्पर्धा आयोजनासाठी येणारा बाबनिहाय खर्च नमूद करुन यासाठी किती वास्तव फी आकारण्यात येणार आहे याचा स्पष्टपणे उल्लेख प्रस्तावात करावा.

४. शासनाने अवांतर स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी संस्थांची यादी जाहीर केली तरी,अवांतर स्पर्धा परीक्षांचे आयोजन शाळांवर बंधनकारक असणार नाही. स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी संबंधित शाळेच्या / संस्थेच्या शाळा व्यवस्थापन समितीची तसेच पालक व शिक्षक संघाची मंजूरी आवश्यक आहे.तसेच सदर परीक्षा विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक राहील.कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यास परीक्षेची सक्ती करण्यात येवू नये.

५. वरील सर्व निकषांचे पालन होत नसल्याच्या,विद्यार्थ्यांना सक्ती होत असल्याच्या तसेच जादा फी आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी सदर संस्थेच्या स्पर्धा परिक्षांवर बंदी घालण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथ.) यांना कळवावे व शिक्षक संचालक (प्राथ.) यांनी याबाबत तपासणी करुन आवश्यकता असल्यास सदर संस्थेस स्पर्धा परिक्षा आयोजित करण्यास बंदी घालण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

६. स्पर्धा विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेस चालना देणारी अथवा अवांतर वाचनास प्रोत्साहन देणारी आहे किंवा कसे याबाबत काही तक्रारी असल्यास शिक्षक संचालक (प्राथ.) यांनी विद्या प्राधिकरण, पुणे यांचे अभिप्राय घेवून,प्रस्ताव शासनाकडे सादर करावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१००४१७४९०३३७२१ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.10.04 17:39:34 +05'30'

(डॉ.सुवर्णा सि.खरात)
सहसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई.
३) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी.
४) प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक.
५) आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे.
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),शिक्षण संचालनालय,पुणे
७) शिक्षण संचालक (प्राथमिक),शिक्षण संचालनालय,पुणे.
८) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे.
९) आयुक्त,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे
१०) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
११) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
१२) निवडनस्ती (एसडी-२)